# सायबर सेक्युरिटी मार्गदर्शन कार्यक्रम



**लोकशाही वार्ता / साकोली**

स्थानीय कृष्णमुरारी कटकवार विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सेक्युरिटी मार्गदर्शन कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशनतर्फे घेण्यात आला. कार्यक्रमाला मार्गदर्शक मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार यांनी मार्गदर्शन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय देवगीकर यांनी पुष्पगुच्छ देऊन मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार यांचे स्वागत केले. मार्गदर्शनात सोशल मीडिया, फ्रॉड कॉल्स, ई-मेल लिंक, सेफ्टी अबाउट पर्सनल डिटेल इन्फॉर्मेशनबद्दल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देण्यात आले. कार्यक्रमासाठी बी.एस. लंजे, संजय पारधी, मते, नेवारे, मडकवार, बिसेन, विठुले, शाहू, शिवदास लांजेवार, संजय भेंडारकर, अविनाश मेश्राम, शिवपाल चन्ने, दिनेश उईके, पुष्पा बोरकर, नीलिमा गेडाम, अनुराधा रणदिवे आदी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.